# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी सरकार कटीबद्ध, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही
- सर्पदंशामुळे मृत्यूप्रकरणी शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- छत्रपती संभाजीनगर इथं होणारी ५२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आर्थिक क्रांती घडवेल – उद्योगमंत्री उदय सामंत यांचं प्रतिपादन
- धाराशिव जिल्ह्यात क्षयरोगमुक्त कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केलेल्या ७१ ग्रामपंचायतींचा गौरव

आणि

- रोबोटेक्स इंडिया नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नारेगाव शाळेतल्या विद्यार्थ्यांना विजेतेपद

****

मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी राज्यशासन कटीबद्ध असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल हिंगोली इथं कावड यात्रेत संबोधित करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या मदतीने मराठवाड्यातला नदीजोड प्रकल्प राज्य शासन पूर्णत्वास नेणार असल्याचं त्यांनी सांगितलं. सर्वसामान्यांना लाभ देणाऱ्या विविध योजना या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सुरू केलेल्या नाहीत, तर त्या कायमस्वरूपी चालणाऱ्या योजना असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. कळमनुरी तालुक्यात प्रस्तावित विपश्यना केंद्राला निधी कमी पडू दिला जाणार नाही, त्याची मान्यता लवकरच देणार

असल्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं. आमदार संतोष बांगर यांनी कळमनुरीच्या चिंचाळेश्वर महादेव मंदिर ते हिंगोली इथल्या महादेव मंदिरापर्यंतची १८ किलोमीटर कावड यात्रा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचं अभिनंदन केलं.

****

सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ देण्याचे निर्देश, मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत. काल राज्य वन्य जीव मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. सर्पदंशावर तत्काळ उपचार मिळावेत यासाठी क्लिनिक ऑन व्हील उपक्रम सुरू करण्याची सूचनाही त्यांनी या बैठकीत केली. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातल्या सदस्याला वनमजुर म्हणून सामावून घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले. वनांमध्ये मेडिकल टुरीजमला प्राधान्य दिल्यास शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल आणि दुर्मिळ वनस्पतींचं जतनही होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या एक पेड माँ के नाम या उपक्रमाची राज्यात जास्तीतजास्त जाणीवजागृती करावी, तसंच राज्यभर ही योजना प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

****

राज्यात जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्प तसंच कृष्णा–भीमा खोऱ्यातील विशेषतः कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातल्या पूर परिस्थिती नियंत्रणासाठी, महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमाचा, काल मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पाला जागतिक बँकेकडून एक हजार ५६२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे.

****

आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय झाल्यास आपल्या पक्षाचा याला पाठिंबा असेल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, असं पवार म्हणाले.

****

महाविकास आघाडी एकत्रितपणे विधानसभा निवडणूक लढवणार असून, ज्यांनी पक्षासाठी मेहनत घेतली अशा निष्ठावान नव्या चेहऱ्यांना निवडणुकीत संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल, असं काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं काल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. मराठवाड्यातल्या महाविकास आघाडीच्या नवनियुक्त खासदारांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

****

हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत आजपासून नागरीकांनी आपल्या घरावर तरंगा फडकावण्याचं आवाहन प्रशासनाने केलं आहे. लातूर जिल्ह्यातल्या प्रत्येक कुटुंबाने या अभियानात सहभाग घेऊन, घरावर तिरंगा फडकावण्याचा मान कुटुंबातल्या महिला सदस्यांना देण्याचं आवाहन, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे.

धाराशिव जिल्ह्यात कळंब नगरपालिकेकडून हर घर तिरंगा अभियानांतर्गत काल गृहभेटीचं आयोजन करण्यत आलं होतं.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं काल नगरपालिकेतर्फे विद्यार्थ्यांची तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी नागरीकांना घरावर तिरंगा फडकावण्याचं आवाहन केलं. छत्रपती संभाजीनगर शहरात आज महापालिकेकडून हर घर तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे, तसंच सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यता आलं आहे.

****

एक धाव सुरक्षेची आणि हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत परभणी इथं वसंतराव नाईक कृषी मराठवाडा विद्यापीठात काल महा मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी फेरीला हिरवा झेंडा दाखवला. हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात सर्वांनी प्राधान्याने सहभागी होण्याचं आवाहन गावडे यांनी यावेळी केलं

****

छत्रपती संभाजीनगर शहरात चार मोठे उद्योजक ५२ हजार कोटी रुपये गुंतवणूक करणार आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं यासंदर्भातल्या बैठकीनंतर ही माहिती दिली. या उद्योजकांचा काल मसिआ या

संघटनेच्या वतीनं सामंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शहरातल्या उद्योजकांनी यावेळी राज्य सरकारला मानपत्र दिलं. हे मानपत्र म्हणजे विरोधकांनी केलेल्या अपप्रचाराला चोख प्रत्युत्तर असल्याचं सामंत यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना सांगितलं. या उद्योगांमध्ये आवश्यक कुशल मनुष्यबळासाठी कंपनीमार्फत कौशल्य प्रशिक्षण देऊन स्थानिकांना नोकरीत सामावून घेतलं जाईल, अशी ग्वाही सामंत यांनी दिली. ते म्हणाले...

***"छत्रपती संभाजीनगर मध्ये सुमारे ५२ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक या परिसरा मध्ये होणार आहे. चार प्रकल्पातील सुमारे १० ते १५ हजार रोजगार मिळणार आहे. रोजगार मिळण्यासाठी या परिसरातील मुलांना–मुलींना जे कॉलिफिकेशन आवश्यक आहे त्याच ट्रेनिंग देयचा निर्णय देखील पण या चार कंपनीनी घेतला आहे. मला असं वाटत की हे प्रकल्प सुरू झाल्या नंतर किंवा यांची काम सुरू झाल्या नंतर एक आर्थिक क्रांतीला संपुर्ण परिसरात होईल आणि अजून हा काही प्रकल्प आहेत ते पुढच्या काही दिवसात मराठवाडात येतील महाराष्ट्रात येतील."***

दरम्यान, बिडकीन औद्योगिक परिसरासाठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ, ही सगळी प्रकरणं येत्या १७ तारखेला मंत्रालयात पाठवावी, असे निर्देश सामंत यांनी दिले.

****

धाराशिव जिल्ह्यात क्षयरोगमुक्त कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी झालेल्या ७१ ग्राम पंचायतीचा राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत काल गौरव करण्यात आला. लातूर विभागात क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाच्या सर्व निर्देशांकात धाराशिव जिल्हा आघाडीवर असल्याचं जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रफिक अन्सारी यांनी यावेळी सांगितलं. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरदास यांनी आपल्या मार्गदर्शनातून टीबी मुक्त पंचायत कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्याने उपस्थित सरपंचांचे आभार व्यक्त केले. तसंच सर्व सरपंचांनी निक्षय मित्र म्हणून, उपचाराखालील क्षय रुग्णांना दरमहा अतिरिक्त पोषण आहार देऊन मदत करण्यासाठी पुढे यावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

****

पुण्यात झालेल्या रोबोटेक्स इंडिया नॅशनल चॅम्पियनशिप २०२४ मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या नारेगाव शाळेतल्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक

पटकावला आहे. हे विद्यार्थी आता एस्टोनिया इथं येत्या सहा आणि सात डिसेंबरला होणाऱ्या, जागतिक पातळीवतील रोबोटिक्स इंटरनॅशनल मध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत आणि शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांनी या विद्यार्थ्यांचं अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून १५ ऑगस्ट पर्यंत शहरात स्वच्छता महाअभियान राबवलं जात आहे. या महाअभियानात विमानतळ प्राधिकरणाने पुढाकार घेत, परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. काल जमात-ए-इस्लामी हिंद या संस्थेसह, नवखंडा महिला महाविद्यालय तसंच BSGM शाळेतर्फे आपापल्या परिसरातल्या नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी स्वच्छताफेरी काढण्यात आली.

****

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेची जनसंघर्ष यात्रा सुरु आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांनी काल लातूर इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेल्या ९ ऑगस्टला तुळजापूर इथून ही यात्रा सुरु झाली आहे. मराठा समाजाला टिकणारं आरक्षण मिळेपर्यंत संघटनेचा लढा सुरू राहणार असल्याचं जावळे यांनी यावेळी स्पष्ट केलं.

****